# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०२/१०/२०१६

**१) शेतातील ईलेक्ट्रीक मोटार पंपाच्या साहीत्याची चोरी . :–**

दिनांक ३०/०९/०१६ रोजी १८.०० ते ०१/१०/२०१६ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी अतुल टिचकुले वय ३५ वर्ष, रा. राजगोपालचारी वार्ड भंडारा यांच्या शेतातील ईलेक्ट्रीक मोटार पंपाचे मास्टर डी. ओ. एल स्टार्टर, ऑटो स्विच एमएम कॉपर वायर ९० मीटर, २.५ एमएमचा कॉपर वायर ४० मीटर, ४५ मीटर कॉपर वायर असा एकुण १५,०५०/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कापुन चांदोरी शेतशिवार येथुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर पलटी झाल्याने ट्रॅक्टर चालकांचा मृत्यु . :–**

दिनांक १५/०९/२०१६ रोजी १६.३१ वा. दर. यातील आरोपी मृतकने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर गिरोला रीठी शेतशिवारातील स्वत:चे शेतात आपल्या ट्रॅक्टरने चिखल करीत असता ट्रॅक्टर चिखला मध्ये फसुन निष्काळजीपने चालवुन ट्रॅक्टर पलटी झाल्याने मृतक हा ट्रॅक्टर खाली दबुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने मर्ग क्र. ४६/१६ क. १७४ जाफौ. चे चौकशी वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ)भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गावंडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०१/१०/२०१६ रोजी १२.३० वा. दर. यातील फिर्यादी ज्ञानेश्वर मोतीराम राखडे वय ४६ वर्ष, रा. साईबाबा राईसमीलचे मागे सेंदुरवाफा हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम १०५६ कि. २०,०००/–रु. ची तहसील कार्यालय साकोली चे आवारात ठेवुन कार्यालयात गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण मोटार सायकल तहसील कार्यालय साकोली येथुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, सिहोरा व साकोली येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४१ लिटर हातभट्टी दारु +नगदी १२० कि. २,६२०/–रु. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारु कि. ३००/–रु. असा एकुण कि. २,९२० /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता